विद्या विकास मंडळाचे,

# सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री, जि. धुळे ४२४३०४ (महाराष्ट्र राज्य)

## आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ (पुरुष) स्पर्धा २०१६-१७

दिनांक :- २४ ऑगस्ट २०१६

दिनांक २३ व २४ ऑगस्ट २०१६ रोजी महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रिडा विभागाद्वारे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत नंदुरबार विभागीय आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ (पुरुष) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेचे उद्घाटन विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष मा. भैय्यासाहेब चंद्रजीत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, डॉ. आर. ए. देवरे, डॉ. एस. एस. सोनवणे, नवापूर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. विजय पाटील, माजी नंदुरबार क्रीडा विभाग सचिव डॉ. प्रियंका सुलाखे, नंदुरबार विभागीय विविध महाविद्यालयांचे क्रीडा संचालक व खेळाडू उपस्थित होते.

स्पर्धेसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत नंदुरबार विभागातील एकूण १५ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते. त्यात एकूण ७५ विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

**सहभागी महाविद्यालयांची नावे खालील प्रमाणे :-**

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | दादासो रावल महाविद्यालय, दोंडाईचा | ९ | कला महाविद्यालय, बामखेडा |
| २ | कला व वाणिज्य महाविद्यालय, खापर | १० | सार्वजनिक महाविद्यालय, विसरवाडी |
| ३ | आर डी देवरे महाविद्यालय, म्हसदी | ११ | वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा |
| ४ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर | १२ | जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार |
| ५ | उत्तमराव पाटील महाविद्यालय, दहिवेल | १३ | औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा |
| ६ | डी. एन. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, शहादा | १४ | पु.सा.गु.वि.प्र. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा |
| ७ | जी टी पाटील महाविद्यालय, नंदुरबार | १५ | सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री |
| ८ | विमलबाई पाटील महाविद्यालय, साक्री | | |

**स्पर्धेचा निकाल :-**

**विजयी** :- डी. एन. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, शहादा

**उपविजयी** :- पु.सा.गु.वि.प्र. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा

**तृतीय** :- कला महाविद्यालय, बामखेडा

24/8/2016

प्रा. हसिनखॉ तडवी
Director of Physical Education,
V.V.M's. S.G. Patil College,
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M's S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist. Dhule

डॉ. आर. आर. अहिरे
Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College
SAKRI, Dist.Dhule

## आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ पुरुष स्पर्धा क्षणचित्रे








स्पर्धेचे उद्घाटन करतांना विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष मा. भैय्यासाहेब चंद्रजीत पाटील सोबत डॉ. एस. एस. सोनवणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, नवापूर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. विजय पाटील, माजी नंदुरबार क्रीडा विभाग सचिव डॉ. प्रियंका सुलाखे व इतर मान्यवर

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

## स्पर्धेदरम्यानची काही क्षणचित्रे





विजयी संघ डी. एन. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, शहादा ला विजय करंडक देताना सन्माननीय मान्यवर

उपविजयी संघ पु.सा.गु.वि.प्र. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा ला उपविजयी करंडक देतांना सन्माननीय मान्यवर





तृतीय स्थान प्राप्त कला महाविद्यालय, बामखेडा ला तृतीय स्थान करंडक देताना सन्माननीय मान्यवर

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College
SAKRI, Dist.Dhule ★

## वृत्तांकन

पुण्य नगरी
शुक्रवार,२६ ऑगस्ट २०१६ । धुळे

# साक्री-नंदुरबार विभागीय आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धा



साक्री : येथील विद्या विकास मंडळाचे सी.गो.पाटील महाविद्यालयात आयोजित उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्यापीठ अंतर्गत नंदुरबार विभागीय आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत शहादा येथील डी.एन.पटेल अभियांत्रिकीचा संघ विजयी झाला तर पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शहादा येथील संघ द्वितीय, कला महाविद्यालय बामखेडा येथील संघ तृतीयस्थानी राहिला. दि.२३ व २४ ऑगस्टदरम्यान आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ (पुरुष)स्पर्धा पार पडल्या. यात एकूण १५ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते. त्यात एकूण ७५ विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

सी.गो.पाटील महाविद्यालयात विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे, उपप्राचार्य डॉ.आर.ए.देवरे, प्रा.डॉ.संजय सोनवणे, भाजपाचे तालुकाध्यक्ष संजय अहिरराव, भाजयुमो तालुकाध्यक्ष डॉ.देवेंद्र देवरे, शहराध्यक्ष महेंद्र देसले ,पं.स. सदस्य पी.एच.पवार, गोरख बोराळे, दीपक वाघ आदींसह सहभागी महाविद्यालयांचे खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या स्पर्धेत एकूण १५ महाविद्यालय सहभागी झाले होते. यावेळी प्राचार्य डॉ.डी.एल.तोरवणे यांच्या हस्ते विजयी संघास चषक देण्यात आला. यावेळी क्रीडा संचालक जे.पी.तोरवणे यांनी प्रथम विजयी संघास आपले वडील कै.पी.एल.पाटील यांच्या स्मरणार्थ चषक प्रदान केला. यावेळी प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे, नंदुरबार विभागीय क्रीडा समितीचे सचिव प्रा. ईश्वर धामणे, क्रीडा समिती सदस्य प्रा.आर.आर.सोनवणे, प्रा.बी.एल.मोरे, प्रा.प्रमोद पाटील, प्रा.प्रियंका सुलाखे, क्रीडा संचालक प्रा.हसन तडवी, निवृत्त क्रीडा संचालक प्रा.बी.डी.देवरे आदी उपस्थित होते.

लोकमत धुळे, गुरुवार, दि. २५ ऑगस्ट २०१६

# पटेल अभियांत्रिकी संघ अव्वल

## बुद्धिबळ स्पर्धा : शहादा महाविद्यालय द्वितीय

साक्री : सी.गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत शहादा येथील डी.एन. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा व तृतीय क्रमांक कला महाविद्यालय, बामखेडा या संघांनी मिळविला आहे. विजयी संघाला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी माजी प्राचार्य डॉ. डी. एस. तोरवणे, प्राचार्य डॉ. आर. आर.



विजेत्या पटेल अभियांत्रिकीच्या संघाला पुरस्कार प्रदान करताना डॉ.डी.एस. तोरवणे, डॉ. आर.आर.अहिरे, डॉ.विजय पाटील, प्रा.ईश्वर धामणे, प्रा. आर.आर. सोनवणे, प्रा.प्रमोद पटेल व प्रा.प्रियंका सुलाडे.

अहिरे, डॉ. विजय पाटील, विभाग क्रीडा समितीचे सचिव प्रा. ईश्वर धामणे, प्रा. आर. आर. सोनवणे, प्रा. प्रमोद पटेल, व प्रा. प्रियंका सुलाडे उपस्थित होते. विजयी संघाला प्रा. जगदीश तोरवणे यांचे वडील पी. एल. पाटील-तोरवणे यांच्या स्मरणार्थ चषक प्रदान करण्यात आला.

सकाळ
शुक्रवार,
२६ ऑगस्ट २०१६

# शहाद्यातील पटेल अभियांत्रिकीचा संघ विजेता

## आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धा : १५ महाविद्यालयांचे संघ सहभागी

साक्री, ता. २५ : येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात झालेल्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत नंदुरबार विभागीय आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत शहादा येथील डी. एन. पटेल अभियांत्रिकीचा संघ विजयी, पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा संघ द्वितीय, तर कला महाविद्यालय बामखेडा येथील संघ तृतीयस्थानी राहिला. आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धा झाल्या. त्यात १५ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते. त्यात एकूण ७५ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

सी. गो. पाटील महाविद्यालयात विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजित पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य डॉ. आर. ए. देवरे, प्रा. डॉ. संजय सोनवणे, भाजपचे तालुकाध्यक्ष संजय अहिरराव, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष डॉ. देवेंद्र देवरे, शहराध्यक्ष महेंद्र देसले आदींसह सहभागी महाविद्यालयांचे खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या स्पर्धेत १५ महाविद्यालयांचे सहभागी झाले होते. स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. यावेळी प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे यांच्या हस्ते विजयी संघास चषक देण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, नंदुरबार विभागीय क्रीडा समितीचे सचिव प्रा. ईश्वर धामणे, क्रीडा समिती सदस्य प्रा. आर. आर. सोनवणे, प्रा. प्रमोद पाटील, प्रा. बी. एल. मोरे, प्रा. हसीन तडवी, निवृत्त क्रीडा संचालक प्रा. बी. डी. देवरे आदी उपस्थित होते.



साक्री : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत नंदुरबार विभागीय आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत विजयी शहादा येथील डी. एन. पटेल अभियांत्रिकीच्या संघास करंडक प्रदान करताना प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे.

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.